नियमीत दिवाणी दावा क्र. २०/२०२२
निशाणी ३५ वर सुरु
वादी तर्फे साक्षीदार क्र. १

शपथेवर पुढे सुरु –

**पुढील सरतपास वादी तर्फे वकील श्री. आर.एस.ठाकरे** –

नि.क्र.३५ नुसार माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असुन त्यामधील संपुर्ण मजकुर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असल्यामुळे मी त्यावर माझी सही केलेली आहे. यादी नि.क्र. ३७ नुसार काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

यादी नि.क्र.३७/१ वर मौजे पारस येथील भुमापन क्र.२३३ या मिळकतीचा ७/१२ उताराची प्रमाणीत प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. यादी नि.क्र.३७/२ मौजे पारस येथील धारणा जमीनींची नोंदवही (नमुना आठ अ) उता–याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. यादी नि.क्र.३७/३ वर मौजे पारस येथील भुमापन क्र.५२ उपविभाग १ अ या मिळकतीच्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. यादी नि.क्र.३७/४ वर मौजे पारस येथील भुमापन क्र.५२ उपविभाग २ या मिळकतीच्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. यादी नि.क्र.३७/५ वर मौजे पारस येथील ९(३),(४) उता–याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. यादी नि.क्र.३७/६ वर मौजे पारस येथील गट क्र.२३३ या मिळकतीच्या उता–याची उपअधिक्षक भुमी अभिलेख बाळापुर यांच्या सही शिक्याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. सदर सर्व दस्तऐवजातील मजकुर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. सर्व दस्ताऐवजांच्या प्रमाणीत प्रती दाखल केलेल्या असल्यामुळे त्यास अनुक्रमे **नि.क्र. ३९ ते ४४** देण्यात येत आहे.

यादी नि.क्र.३७/८ वर प्रतिवादी जाहागीर खा रसुल खा यांना दि.०८.०६.२०२० रोजी माझे विधीज्ञ रफीक एच. शेख यांच्या मार्फत पाठविलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखल केलेली असुन त्यावर माझ्या पुर्व विधीज्ञांची सही असुन त्यातील मजकुर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ४५** देण्यात येत आहे. यादी नि.क्र. ३७/१० वर प्रतिवादी जाहागीर खा रसुल खा व इतर ७ यांना माझे रफीक एच. शेख यांच्या मार्फत दि. १३.०९.२०२१ रोजी पाठविण्यात आलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखल केलेली असुन त्यावर माझ्या विधीज्ञांची

सही आहे. त्यातील संपुर्ण मजकुर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ४६** देण्यात येत आहे. यादी नि.क्र. ३७/११ वर विधीज्ञ श्री. एस.टी. इंगळे यांच्या मार्फत दि. २१.०९.२०२० रोजी मी पाठविलेल्या नोटीस चे उत्तर प्राप्त झालेले असुन मला पाठविण्यात आलेले मुळ प्रत प्राप्त झाली आहे. त्यास **नि.क्र. ४७** देण्यात येत आहे.

यादी नि.क्र. ३७/१२ (१) ते १२ (८) एकुण पोष्टाच्या मुळ आठ पावत्या दाखल केलेल्या आहेत. त्यास एकत्रीतपणे **नि.क्र. ४८** देण्यात येत आहे. यादी नि.क्र. ३७/१३ वर पोष्टाची एक मुळ पावती दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र. ४९** देण्यात येत आहे. यादी नि.क्र. १४/(१) ते १४ (६) एकुण सहा भारतीय डाक विभागाच्या मुळ पोच पावत्या दाखल केलेल्या आहे. त्यास एकत्रितपणे **नि.क्र.५०** देण्यात येत आहे.

यादी नि.क्र.३७/१५ वर शेख इरशाद शेख युनुस यांना पाठविलेली नोटीस परत आलेली असुन त्या नोटीसचे पोष्टा मार्फत मिळालेले सिल बंद पाकीट दाखल केलेले आहे. त्यास **नि.क्र. ५१** देण्यात येत आहे. यादी नि.क्र. ३७/१६ वर शेख नैशाद शेख युनुस यांना पाठविलेली नोटीस परत आलेली असुन त्या नोटीसचे पोष्टा मार्फत मिळालेले सिल बंद पाकीट दाखल केलेले आहे. त्यास **नि.क्र. ५२** देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण

**उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री.एस.टी. इंगळे.**

प्रतिवादीच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखे पर्यत तहकुब.

**दि. २६/०६/२०२४**

समक्ष

(विष्णु द. गिते)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
बाळापूर

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2024.06.26 17:14:26 +0530

(विष्णु द. गिते)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
बाळापूर

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 26/06/2024 |
| Order signed by P.O on | :- | 26/06/2024 |
| Order uploaded on | :- | 26/06/2024 |